CNR.No.MHOS040001322026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २९/२०२६ व**
**उर्मिला मोहन कांबळे वि. निरंक**

## निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ मधील कलम २ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी सादर केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे :-**

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, **मोहन विठ्ठल उर्फ विठोबा कांबळे** हे दिनांक **२९/१०/२०२३** रोजी निवारा नगर, एम.आय.डी.सी. रोड, सोलापूर साऊथ, ता. जि. सोलापूर येथे मयत झाले आहेत. मयत **मोहन विठ्ठल उर्फ विठोबा कांबळे** यांचे कायमचे राहण्याचे ठिकाण हे मौजे शहापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव होते. मयत **मोहन विठ्ठल उर्फ विठोबा कांबळे** अर्जदार क्र १ यांचे पती, अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील, अर्जदार क्र. ५ व ६ यांचा मुलगा आहे. मयत **मोहन विठ्ठल उर्फ विठोबा कांबळे** यांना अर्जदारांशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना **मोहन विठ्ठल उर्फ विठोबा कांबळे** यांच्या मृत्यूनंतर ते कायदेशीर वारस असलेबाबत शासकीय व निमशासकीय कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर **दिनांक ०८/०३/२०२६** रोजीचे 'आम संघर्ष टाईम्स' या वर्तमानपत्रामध्ये नोटीस जाहीर करण्यात आली आहे. सदर वर्तमानपत्राची प्रत (नि.क्र. १०) वर दाखल आहे. अर्जदारांनी **मोहन विठ्ठल कांबळे** यांचे मृत्यू प्रमाणपत्र (नि.क्र.१२) वर दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार यांनी त्यांच्या आधारकार्डची छायांकित प्रती (नि.क्र.१३ ते १८ ) वर दाखल केले आहे. तसेच **कांबळे विठ्ठल महादू** यांच्या रेशनकार्डची छायांकित प्रत व मौजे शहापूर येथील गट क्र. २२७ चा ७/१२ उताराची छायांकित प्रत कागदपत्रांची यादी (नि.क्र.२२) सह दाखल केलेल्या आहेत.

४. उपरोक्त वर्तमानपत्रामधील जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेकडून अर्जदार हे मयत **मोहन विठ्ठल उर्फ विठोबा कांबळे** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत आक्षेप असलेस जाहीर प्रगटन काढून आक्षेप मागविणेत आले. परंतु, आजतागायत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

५. अर्जदार क्र. २ गणेश मोहन कांबळे यांनी त्यांचे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्रं.११) वर दिले आहे. अर्जदारांतर्फे साक्षीदार नामे-१. काशिनाथ नारायण धोंगडे यांनी (नि.क्र.१९) आणि साक्षीदार नामे-२. सागर अंबादास काजळे (नि.क्र.२०) अन्वये पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. तदनंतर अर्जदारांनी प्रकरणात इतर पुरावा देणे नसल्याबाबतची पुरसीस (नि.क्र. २३) वर

दाखल केली आहे. नमुद शपथपत्रात साक्षीदारांनी अर्जदारांव्यतिरिक्त मयत **मोहन विठ्ठल उर्फ विठोबा कांबळे** यांचे इतर कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद केले आहे.

**६.** अर्जदारांनी अर्जासमवेत मोहन विठ्ठल उर्फ विठोबा कांबळे असे नाव असलेले एकही दस्त दाखल केलेले नाही. अर्जदारांनी मयत **मोहन विठ्ठल उर्फ विठोबा कांबळे** हे मौजे शहापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथील मूळ रहिवासी असल्याचे अर्जात नमूद केले आहे. परंतु, त्याबाबत कोणतेही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांवरून मोहन विठ्ठल कांबळे हे दिनांक २९/१०/२०२३ रोजी सोलापूर येथे मयत झाल्याचे व ते सोलापूर येथीलच रहिवासी असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत सदरचा अर्ज चालविण्याचा अधिकार या न्यायालयास नाही. त्यामुळे, अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आ दे श

१) अर्ज नामंजुर करण्यात येतो.

MUKKANWAR ANUPAM RAJENDRA
Digitally signed by MUKKANWAR ANUPAM RAJENDRA
Date: 2026.08.04 18:24:10 +0530

**दिनांक :-०४/०८/२०२६.** **(अ.रा. मुक्कनवार)**

**ठिकाण :- तुळजापूर** **३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**तुळजापूर.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Anuja j. Patil, Gr. III |
| Court | - | 3rd Jt.CJJD & JMFC Tuljapur |
| Date | - | 04/08/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 04/08/2026 |
| Order uploaded on | - | 04/08/2026 |